प्रकरण – I

आढावा

प्रकरण I

आढावा

1.1 राज्याची रूपरेषा

महाराष्ट्र भारताच्या पश्चिम भागात वसलेला असून त्याच्या पश्चिम सीमेला अरबी समुद्र आहे. याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेला तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत. याला 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने (3.08 लाख चौरस किलोमीटर) हे तिसरे सर्वात मोठे राज्य आहे आणि देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्येचे राज्य आहे.

2011 मधील राज्याची लोकसंख्या 11.24 कोटींवरून वाढून 2024 मध्ये 12.74 कोटी झाली. राज्याची या दशकातील (2014-24) लोकसंख्येची वाढ 9.62 टक्के नोंदवली गेली. दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी 17.35 *टक्के* होती, जी अखिल भारतीय सरासरी 21.92 *टक्क्यांच्या* (2011 च्या जनगणनेनुसार) तुलनेत कमी होती. राज्यात 36 जिल्हे आणि 358 तालुके आहेत. राज्याचा साक्षरतेचा दर 82.30 *टक्के* होता जो अखिल भारतीय सरासरी 73 टक्क्यांपेक्षा (2011 च्या जनगणनेनुसार) नऊ *टक्के* अधिक होता. **परिशिष्ट 1.1** मध्ये राज्याची रूपरेषा दर्शविली आहे.

1.1.1 राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न

देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न म्हणजे विशिष्ट कालावधीत राज्याच्या हद्दीत उत्पादित सर्व अधिकृतपणे मान्यताप्राप्त वस्तू आणि सेवांचे मूल्य. देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नामधील वाढ ही राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा निर्देशांक आहे कारण ती कालांतराने राज्याच्या आर्थिक विकासाच्या पातळीवर झालेल्या बदलाचे प्रमाण दर्शविते.

स्थूल राज्य मूल्यवृद्धी म्हणजे अंतिम उत्पन्नाच्या मूल्यातून अंतरिम उपभोगाच्या उत्पन्नाचे मूल्य वगळून उरलेले मूल्य होय. उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रम व भांडवल यांचे योगदान म्हणजे मूल्यवर्धित उत्पन्न होय. जेव्हा उत्पादनावर (उत्पादनावरील अनुदान वगळून) कर लावला जातो तेव्हा सगळ्या घरगुती घटकांची मूल्यवर्धित किंमत देशांतर्गत स्थूल उत्पन्नाची किंमत दर्शविते.

प्रचलित किंमतीवर आधारित स्थूल देशांतर्गत उत्पन्न आणि स्थूल राज्य उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचा कल **तक्ता 1.1** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.1: देशांतर्गत स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत स्थूल राज्य उत्पन्नाचा कल (प्रचलित किंमतीवर)

वर्ष	2019-20	2020-21+++	2021-22++	2022-23+	2023-24$
भारत					
देशांतर्गत स्थूल उत्पन्न (2011-12 मालिका) (₹ कोटीत)	20103593	19854096	23597399	26949646	29535667
स्थूल मूल्यवृद्धी (प्रचलित किंमतीवर) (₹ कोटीत)	18381117	18210997	21635584	24659041	26762147
मागील वर्षाच्या तुलनेत स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा विकास दर (*टक्क्यात*)	6.37	-1.24	18.85	14.21	9.60
मागील वर्षाच्या तुलनेत मूल्यवृद्धीचा विकास दर (*टक्क्यात*)	7.02	-0.93	18.81	13.97	8.53
दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पन्न (₹ मध्ये)	149915	146480	172422	194879	211725
महाराष्ट्र					
देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न (2011-12 मालिका) (₹ कोटीत)	2656806	2610651	3144138	3645884	4044251
स्थूल राज्य मूल्यवृद्धी (प्रचलित किंमतीवर) (₹ कोटीत)	2350571	2332152	2792558	3206193	3531300
मागील वर्षाच्या तुलनेत स्थूल राज्य उत्पन्नाचा विकास दर (*टक्के*)	5.06	-1.74	20.44	15.96	10.93
मागील वर्षाच्या तुलनेत स्थूल मूल्यवृद्धीचा विकास दर (*टक्क्यात*)	6.04	-0.78	19.74	14.81	10.14
दरडोई देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न (₹ मध्ये)	216319	210603	251521	289404	318560

स्त्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, केंद्र शासन (https://mospi.gov.in/web/mospi/download-tables-data/-/reports/view)

$ आगाऊ अंदाज +पहिला सुधारित अंदाज ++दुसरा सुधारित अंदाज +++तिसरा सुधारित अंदाज

तक्ता 1.1 मधून असे निदर्शनास आले की, महाराष्ट्राचे प्रचलित किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न, 2019-20 ते 2023-24 या पाच वर्षांच्या कालावधीतील तीन वर्षांदरम्यान म्हणजेच 2021-22 ते 2023-24 दरम्यान स्थूल देशांतर्गत उत्पन्नाशी तुलना करता अधिक दराने वाढले, राष्ट्रीय विकास दराचा कल 10.10 *टक्क्यांच्या* तुलनेत वार्षिक चक्रवाढ वृद्धी दराने 11.08 *टक्के* इतका होता. 2023-24 दरम्यान प्रचलित किंमतीनुसार राज्याचे दरडोई स्थूल राज्य उत्पन्न ₹ 3,18,560 होते जे त्या वर्षातील ₹ 2,11,725 राष्ट्रीय दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पन्नापेक्षा लक्षणीयरित्या अधिक होते.

देशांतर्गत स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत स्थूल मूल्यवृद्धी हा आर्थिक विकासाचा चांगला निर्देशांक मानला जात असल्यामुळे आणि कर व अर्थसहाय्याच्या परिणामाकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे केंद्र शासन आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडून आर्थिक

विश्लेषणासाठी स्थूल मूल्यवृद्धी वापरली जात आहे. देशांतर्गत स्थूल उत्पन्नाची गणना खाजगी उपभोग खर्च, शासकीय उपभोग खर्च आणि स्थूल स्थिर भांडवल निर्मिती किंवा गुंतवणूक खर्च यासह अर्थव्यवस्थेत झालेल्या विविध प्रकारच्या खर्चाची बेरीज म्हणून केली जाऊ शकते आणि केली जाते, जी अर्थव्यवस्थेतील मागणीची परिस्थिती मूलत: प्रतिबिंबित करते. अनुदाने आणि निव्वळ करांच्या उपचारांमध्ये दोन्ही परिमाण भिन्न आहेत. स्थूल मूल्यवृद्धीमध्ये करांचा समावेश नाही तर देशांतर्गत स्थूल उत्पन्नामध्ये आहे. करांच्या समावेशाच्या या फरकांचा परिणाम म्हणून, देशांतर्गत स्थूल उत्पन्न हे वास्तविक उत्पन्न परिस्थितीपेक्षा भिन्न असू शकते. धोरणकर्त्यांच्या दृष्टीकोनातून, म्हणूनच, अधिक चांगल्या विश्लेषणासाठी आणि धोरणात्मक हस्तक्षेप करण्यासाठी स्थूल मूल्यवृद्धी आणि स्थूल राज्य मूल्यवृद्धी विदाची तुलना करणे महत्वाचे आहे.

2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी स्थूल राज्य उत्पन्न आणि स्थूल राज्य मूल्यवृद्धीच्या वाढीचा कल **आलेख 1.1** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 1.1: स्थूल राज्य उत्पन्न आणि स्थूल राज्य मूल्यवृद्धीच्या वाढीचा कल (2019-20 ते 2023-24)



(स्त्रोत: महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2023-24)

आलेख 1.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2021-22 ते 2023-24 दरम्यान प्रचलित किमतीवर आधारित स्थूल राज्य उत्पन्न वाढीचा दर हा स्थूल राज्य मूल्यवृद्धीच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त होता जो दर्शवितो की, राज्याने प्राप्त केलेला कर प्रदान केलेल्या अनुदानापेक्षा जास्त होता. स्थूल राज्य मूल्यवृद्धीचा क्षेत्रीय योगदानातील बदल हा अर्थव्यवस्थेच्या बदलत्या रचनेचे द्योतक आहे. गेल्या पाच वर्षांतील स्थूल राज्य मूल्यवृद्धीची क्षेत्रवार वाढ **आलेख 1.2** मध्ये तपशीलवार दर्शविली आहे.

आलेख 1.2: 2019-20 ते 2023-24 दरम्यान स्थूल राज्य मूल्यवृद्धीमधील क्षेत्रीय वाढ

(टक्क्यात)



	2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
कृषी	19.8	11.0	18.9	4.6	3.8
उद्योग	-7.6	3.9	24.2	5.8	6.5
सेवा	10.4	-4.9	17.9	21.3	12.9

कृषी **उद्योग** **सेवा**

(स्त्रोत: महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2023-24)

(2020-21: तिसरा सुधारित अंदाज; 2021-22: दुसरा सुधारित अंदाज; 2022-23: पहिला सुधारित अंदाज; 2023-24: अग्रिम अंदाज)

वर्ष 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठीचा स्थूल राज्य उत्पन्नामधील क्षेत्रवार वाढीचा कल **आलेख 1.2** मध्ये दर्शविला आहे. वर्ष 2021-22 पासून कृषी क्षेत्रातील वाढीचा दर उतरता कल दाखवितो. वर्ष 2022-23 च्या तुलनेत वर्ष 2023-24 दरम्यान उद्योग व सेवा क्षेत्रात अनुक्रमे 6.5 व 12.9 *टक्के* इतकी वाढ झाली आहे.

2021-22 मध्ये स्थूल राज्य मूल्यवृद्धीमध्ये योगदान देणाऱ्या तीनही क्षेत्रांमध्ये लक्षणीय वाढ झाली, ज्याचे श्रेय कोविड-19 महामारीनंतरच्या आर्थिक पुनर्प्राप्तीस दिले गेले.

1.2 राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवालाचा आधार आणि दृष्टीकोन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) नुसार, एखाद्या राज्याच्या लेख्यांशी संबंधित भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा अहवाल राज्याच्या राज्यपालांना सादर करावा लागतो, जो ते राज्याच्या विधिमंडळासमोर ठेवतात. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अन्वये राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल तयार करून सादर केला जातो.

प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई हे प्रारंभिक हिशेब ठेवण्याची जबाबदारी असलेल्या कोषागार, कार्यालये आणि विभागांनी सादर केलेल्या प्रारंभिक लेख्यांमधून आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांमधून दरवर्षी राज्याचे वित्तीय लेखे व विनियोजन लेखे तयार करतात. या लेख्यांचे प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडून

स्वतंत्रपणे लेखापरीक्षण केले जाते आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांद्वारे प्रमाणित केले जाते.

राज्याचे वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे हे या अहवालाची मूलभूत माहिती आहे. इतर स्त्रोतांचा विचार करून देखील विश्लेषण केले जाते, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

- राज्याचा अर्थसंकल्प- अंदाजपत्रकाच्या तुलनेत राजकोषीय निकष आणि प्राधान्यक्रमांचे मूल्यमापन करणे, तसेच त्याच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे आणि संबंधित नियम आणि विहित कार्यपद्धतींचे पालन करणे.
- प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई व प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयांनी केलेल्या लेखापरीक्षणाचे निकाल.
- विभागीय अधिकारी आणि कोषागारांकडून प्राप्त झालेला इतर आर्थिक विदा.
- स्थूल राज्य उत्पन्न विदा आणि राज्याशी संबंधित इतर सांख्यिकी.
- पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींचा अहवाल.
- महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005.
- केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्त्वे.

29 ऑगस्ट 2024 रोजी राज्याच्या वित्त विभागासोबत एक प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षण दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आला होता. अहवालाचा मसुदा अभिप्रायासाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. अहवालातील निष्कर्षांवर चर्चा करण्यासाठी 24 जानेवारी 2025 रोजी निर्गमन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

शासनाची उत्तरे, जिथे प्राप्त झाली आहेत, ती योग्य ठिकाणी या अहवालात समाविष्ट करण्यात आली आहेत.

1.3 शासकीय लेख्यांची रचना आणि अर्थसंकल्पीय प्रक्रियेचा आढावा

राज्य शासनाचे लेखे तीन भागांत ठेवण्यात येतात:

1. राज्याचा एकत्रित निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266(1)}

या निधीमध्ये राज्य शासनाला मिळणारा सर्व महसूल, राज्य शासनाने घेतलेली सर्व कर्जे (बाजार कर्जे, रोखे, केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे, वित्तीय संस्थांकडून कर्जे, राष्ट्रीय अल्पबचत निधीला देण्यात आलेले विशेष रोखे इ.), भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले अर्थोपाय अग्रिमे आणि राज्य शासनाला कर्जाच्या परतफेडीसाठी प्राप्त झालेल्या सर्व रकमा यांचा समावेश होतो. कायद्यानुसार आणि भारतीय संविधानात दिलेल्या उद्देशांसाठी आणि पद्धतीने नसल्यास या निधीतून कोणत्याही रकमेचा विनियोग करता येणार नाही. खर्चाच्या काही श्रेणी (उदा. घटनात्मक अधिकाऱ्यांचे वेतन, कर्जाची परतफेड इ.) या राज्याच्या एकत्रित निधीवर भारित असतात (भारीत खर्च) आणि विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात. इतर सर्व खर्च (दत्तमत खर्च) विधिमंडळाद्वारे मतदानाने केले जातात.

2. राज्याचा आकस्मिक निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 267(2)}

हा निधी अग्रधन स्वरूपाचा असतो, जो राज्य विधिमंडळाने कायद्याने स्थापन केलेला आणि राज्य विधिमंडळाकडून अशा खर्चास मान्यता मिळेपर्यंत अनपेक्षित खर्च भागविण्यासाठी आगाऊ रक्कम देता यावी यासाठी राज्यपालांच्या ताब्यात ठेवला जातो. झालेला खर्च हा राज्याच्या एकत्रित निधीच्या संबंधित कार्यात्मक मुख्यशीर्षामधून वजा करून हा निधी परतफेड केला जातो.

3. राज्याचे लोक लेखे {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266(2)}

उपरोक्त दिलेल्या व्यतिरिक्त, जेथे शासन बँकर किंवा विश्वस्त म्हणून कार्य करते तेथे शासनाला किंवा त्यांच्यावतीने प्राप्त होणाऱ्या इतर सर्व सार्वजनिक रकमा या लोक लेख्यांमध्ये जमा केल्या जातात. अल्पबचत आणि भविष्य निर्वाह निधी, ठेवी (व्याजासहित आणि व्याजविरहित), अग्रिमे, राखीव निधी (व्याजसहित आणि व्याजविरहित), वित्तप्रेषण आणि निलंबन शीर्ष (अंतिम नोंद प्रलंबित असेपर्यंत हे दोन्ही तात्पुरते शीर्ष आहेत) यांसारख्या परतफेडीचा लोक लेख्यात समावेश आहे. शासनाकडे उपलब्ध निव्वळ रोख शिल्लक देखील लोक लेख्यात समाविष्ट केली जाते. लोक लेखे विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात.

अर्थसंकल्प दस्तऐवज

भारतात प्रत्येक आर्थिक वर्षाच्या संदर्भात राज्य शासनाच्या अंदाजित जमा आणि खर्चाचे विवरणपत्र राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहासमोर किंवा सभागृहांसमोर सादर करणे घटनात्मक आवश्यकता आहे (अनुच्छेद 202). हे 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' हा मुख्य अर्थसंकल्पीय दस्तऐवज आहे. शिवाय अर्थसंकल्पात महसुली खात्यावरील खर्च हा इतर खर्चापेक्षा वेगळा असणे आवश्यक आहे. यात खालील प्रमाणे समाविष्ट आहे:

- **महसुली जमांमध्ये** कर महसूल, करेतर महसूल, केंद्रीय कर/शुल्कांचा हिस्सा आणि केंद्र शासनाकडून मिळालेले अनुदान यांचा समावेश आहे.
- **महसुली खर्चात** राज्य शासनाच्या त्या सर्व खर्चाचा समावेश होतो, ज्यामुळे भौतिक किंवा वित्तीय मालमत्ता तयार होत नाही. राज्य शासनाच्या विभागांच्या व विविध सेवांच्या सामान्य कामकाजासाठी होणारा खर्च, राज्य शासनाने घेतलेल्या कर्जावरील व्याज प्रदाने आणि विविध संस्थांना देण्यात येणारे अनुदान (जरी काही अनुदाने मालमत्ता निर्मितीसाठी असली तरी) यांच्याशी संबंधित आहे.
- **भांडवली जमांमध्ये** हे समाविष्ट आहे:
  - ➢ **लोक ऋण जमा:** बाजार कर्जे, रोखे, वित्तीय संस्थांकडून घेतलेली कर्जे, अर्थोपाय अग्रिमे अंतर्गत निव्वळ व्यवहार, केंद्र शासनाकडून कर्जे आणि अग्रिमे इत्यादी.
  - ➢ **ऋणेतर जमा:** निर्गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न, कर्जे व अग्रिमे वसुली

- **भांडवली खर्चामध्ये** जमीन, इमारत, यंत्रसामग्री, उपकरणे यांच्या संपदनावरील खर्च, भागभांडवलांमधील गुंतवणूक आणि सार्वजनिक उपक्रम आणि इतर संस्थांना राज्य शासनाकडून कर्ज आणि अग्रिमे यांचा समावेश आहे.

सद्यस्थितीत आपल्याकडे राज्यात कार्यक्षम आणि सुलभ अशा दोन्हीही गोष्टी समाविष्ट असलेली एक लेखा वर्गीकरण प्रणाली आहे.

	व्यवहाराचे गुणधर्म	**वर्गीकरण**
महानियंत्रक, लेखे यांच्याद्वारे प्रमाणित केलेली मुख्य आणि गौण शीर्षे यांची यादी	कार्य- शिक्षण, आरोग्य इ./ विभाग	मुख्यशीर्षाखालील अनुदाने (4 अंकी)
	उप-कार्य	उप मुख्यशीर्ष (2 अंकी)
	कार्यक्रम	गौण शीर्ष (3 अंकी)
राज्यांना परिवर्तनशीलता प्रदान	योजना	उप शीर्ष (2 अंकी)
	उप-योजना	सविस्तर शीर्ष (2 अंकी)
	आर्थिक स्वरूप/क्रियाकलाप	उद्देश शीर्ष (2 अंकी) *वेतन, गौण कामे इत्यादी.*

कार्यात्मक वर्गीकरणामुळे आपल्याला विभाग, कार्य, योजना किंवा कार्यक्रम आणि खर्चाचा उद्देश कळतो. आर्थिक वर्गीकरण हे महसूल, भांडवल, कर्ज *इ.* प्रदाने संघटित करण्यास मदत करते. आर्थिक वर्गीकरण चार अंकी मुख्यशीर्षातील पहिल्या अंकाच्या तर्कसंगतेद्वारे साध्य केले जाते. उदा., 0 व 1 महसुली जमांसाठी, 2 व 3 महसुली खर्चासाठी *इ.* आर्थिक वर्गीकरण हे काही उद्देश शीर्षाच्या अंगभूत व्याख्या व वितरण याद्वारे साध्य केले जाते. उदाहरणार्थ, "वेतन" उद्देश शीर्ष म्हणजे महसुली खर्च, तर "बांधकाम" उद्देश शीर्ष म्हणजे भांडवली खर्च. उद्देश शीर्ष हे अर्थसंकल्पीय दस्तऐवजातील विनियोजनाचे प्राथमिक एकक आहे.

शासकीय लेख्यांच्या संरचनेचे सचित्र वर्णन पुढीलप्रमाणे आहे:



लोक ऋण आणि लोक दायित्वे

या अहवालात 'लोक ऋण' यामधे बाजारातील कर्ज, संस्थात्मक कर्जे, राष्ट्रीय अल्पबचत निधीला देण्यात आलेले विशेष कर्जरोखे, केंद्र शासनाने दिलेले कर्ज इत्यादींचा समावेश आहे. यासाठी 6003 व 6004-लोक ऋण या मुख्यशीर्षांचा विचार करण्यात आला आहे.

याशिवाय लोक लेख्यांतर्गत 'अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी *इ.*', 'राखीव निधी' आणि 'ठेवी व अग्रिमे' यांच्याशी संबंधित व्यवहार असे आहेत की प्राप्त झालेल्या रकमांची परतफेड करण्याचे दायित्व शासनावर असते किंवा दिलेली रक्कम वसूल करण्याचा दावा केलेला असतो. लेख्यांतर्गत 'वित्तप्रेषणे' आणि 'निलंबन' यांच्याशी संबंधित व्यवहारांमध्ये केवळ कोषागार आणि तिजोरी दरम्यान रोख रक्कम पाठविणे आणि विविध लेखा वर्तुळात हस्तांतरण यासारख्या व्यवहारांचे समायोजन करणे समाविष्ट आहे.

या अहवालात 8001 ते 8554 'अल्पबचत', 'भविष्य निर्वाह निधी' इ., 'राखीव निधी' आणि 'ठेवी व अग्रिमे' या प्रमुख शिर्षकांखालील व्यवहारांसह 6003 व 6004 या मुख्यशीर्षाखालील व्यवहारांचा समावेश करण्यासाठी 'लोक दायित्व' याचा समावेश करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीय प्रक्रिया

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 202 नुसार राज्याचे राज्यपाल यांनी 2023-24 या वर्षासाठीचा राज्याच्या अंदाजित जमा आणि खर्चाचे विवरण वार्षिक वित्तीय विवरणपत्राच्या स्वरूपात (ज्याला अर्थसंकल्प म्हणून संबोधले जाते) राज्य विधिमंडळासमोर ठेवले. अनुच्छेद 203 नुसार हे विवरणपत्र अनुदान/विनियोजन मागण्यांच्या स्वरूपात राज्य विधिमंडळात सादर केले व ते मंजूर झाल्यानंतर एकत्रित निधीतून आवश्यक रकमेच्या विनियोजनाची तरतूद करण्यासाठी अनुच्छेद 204 अन्वये विनियोजन विधेयक विधिमंडळात संमत केले.

राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यासाठी वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे यांच्या मूलभूत विदेचा वापर केला जातो. हे लेखे 24-2023 या वर्षातील राज्याच्या प्रत्यक्ष जमा आणि खर्चावर आधारित आहेत, ज्यात भारतीय रिझर्व बँकेने केलेल्या विविध आंतर-शासकीय आणि इतर समायोजनांचा समावेश आहे. या जमा व खर्चाचा अंदाज अंदाजपत्रकात असून खर्चास राज्य विधिमंडळाने मान्यता दिली आहे, हे लक्षात घेऊन राज्याच्या 24-2023 च्या अंदाजपत्रकाचा बारकाईने अभ्यास करून अर्थसंकल्पातील अंदाजांच्या अनुषंगाने वर्षभरातील प्रत्यक्ष जमा व खर्चाचे विश्लेषण करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेत अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेचा तपशील देण्यात आला असून, त्यात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे आणि खर्चाच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य शासनाला मार्गदर्शन केले जाते. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आणि राज्य शासनाच्या इतर अर्थसंकल्पीय उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या लेखापरीक्षण तपासणीचे निष्कर्ष या अहवालाच्या **प्रकरण III** मध्ये तपशीलवार दिले आहेत.

1.3.1 वित्तव्यवस्थेचे संक्षिप्त चित्रण

2023-24 च्या अर्थसंकल्पीय अंदाजांच्या तुलनेत 2022-23 आणि 2023-24 या वर्षातील प्रत्यक्ष आर्थिक निकाल यांचे संक्षिप्त चित्रण खालील तक्त्यात देण्यात आले आहे.

तक्ता 1.2: अर्थसंकल्पीय अंदाजांच्या तुलनेत प्रत्यक्ष

(₹ कोटीत)

अ. क्र.	घटक	2022-23 प्रत्यक्ष	2023-24		प्रत्यक्षाशी अर्थसंकल्पीय अंदाजाशी टक्केवारी	प्रत्यक्षाशी स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी
			अर्थसंकल्पीय अंदाज	प्रत्यक्ष		
1	कर महसूल	337487.28	362705.88	373693.12	103.03	9.24
	स्वत:चा कर महसूल	277486.31	298181.00	302343.37	101.40	7.48
	केंद्रीय कर/शुल्काचा हिस्सा	60000.97	64524.88	71349.75	110.58	1.76
2	करेतर महसूल	16776.41	24169.70	20857.94	86.30	0.52

अ. क्र.	घटक	2022-23 प्रत्यक्ष	2023-24		प्रत्यक्षाशी अर्थसंकल्पीय अंदाजाशी टक्केवारी	प्रत्यक्षाशी स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी
			अर्थसंकल्पीय अंदाज	प्रत्यक्ष		
3	सहाय्यक अनुदान व अंशदान	51414.24	62647.02	36045.40	57.54	0.89
4	**महसुली जमा (1+2+3)**	**405677.93**	**449522.61**	**430596.46**	**95.79**	**10.65**
5	कर्जे व अग्रिमे वसुली	642.62	2426.57	742.20	30.59	0.02
6	इतर जमा	0.00	0.00	0.00	0.00	0.00
7	कर्जे आणि इतर दायित्वे[अ]	67601.87	95500.80	90559.36	94.83	2.24
8	**भांडवली जमा (5+6+7)**	**68244.49**	**97927.37**	**91301.56**	**93.23**	**2.26**
9	**एकूण जमा (4+8)**	**473921.55**	**547449.98**	**521898.02**	**95.33**	**12.90**
10	**महसुली खर्च ज्यापैकी**	**407614.40**	**465645.02**	**444350.46**	**95.43**	**10.99**
11	व्याज प्रदाने	41689.16	50647.64	45651.91	90.14	1.13
12	**भांडवली खर्च ज्यापैकी**	**66308.02**	**81804.96**	**77547.56**	**94.80**	**1.92**
13	भांडवली खर्च	61643.61	73900.84	72573.40	98.20	1.79
14	कर्ज आणि अग्रिमे	4664.41	7904.12	4974.16	62.93	0.12
15	**एकूण खर्च (10+12)**	**473922.42**	**547449.98**	**521898.02**	**95.33**	**12.90**
16	**महसुली तूट (4-10)**	**(-)1936.47**	**(-)16122.42**	**(-)13754.00**	**85.31**	**(-)0.34**
17	**राजकोषीय तूट {(4+5+6)-15}**	**(-)67601.87**	**(-)95500.80**	**(-)90559.36**	**94.83**	**(-)2.24**
18	**प्राथमिक तूट (17-11)**	**(-)25912.71**	**(-)44853.17**	**(-)44907.45**	**100.12**	**(-)1.11**

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

(अ) कर्जे व इतर दायित्वे: लोक ऋणांचे निव्वळ (जमा-संवितरणे) + आकस्मिकता निधीचे निव्वळ + लोक लेख्याचे निव्वळ (जमा-संवितरणे) + आरंभिक व अंतिम रोख शिल्लकीचे निव्वळ.

2023-24 मध्ये राज्याची महसुली जमा (₹ 4,30,596.46 कोटी) तसेच महसुली खर्च (₹ 4,44,350.46 कोटी) अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे 4.21 *टक्के* व 4.57 *टक्क्यांनी* किरकोळ कमी होता. तसेच, भांडवली खर्चही अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा 5.20 *टक्क्यांनी* कमी होता.

वर्ष 2020-21 आणि 2021-22 दरम्यान वस्तू व सेवा कर भरपाई निधीतील अपुऱ्या शिल्लक रकमेमुळे केंद्र शासनाने कर्ज घेतले आणि राज्यांवर परतफेडीचे कोणतेही दायित्व नसणारे पाठोपाठ कर्ज म्हणून राज्यांना दिले. महाराष्ट्राला 2021-22 मध्ये ₹ 13,782.36 कोटी आणि 2020-21 मध्ये ₹ 11,977 कोटीचे एका पाठोपाठ दुसरे कर्ज प्राप्त झाले.

1.3.2 शासनाची मत्ता आणि दायित्वे यांचे संक्षिप्त चित्रण

शासकीय लेख्यांमध्ये शासनाची आर्थिक दायित्वे आणि केलेल्या खर्चातून निर्माण झालेली मत्ता यांचा समावेश असतो. दायित्वांमध्ये प्रामुख्याने देशांतर्गत कर्जे, केंद्र शासनाकडून कर्जे आणि अग्रिमे, सार्वजनिक लेख्यांमधून जमा व राखीव निधी आणि मत्तांमध्ये प्रामुख्याने भांडवली खर्च आणि राज्य शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे आणि रोख शिल्लक यांचा समावेश आहे. 31 मार्च 2023 च्या संबंधित स्थितीच्या तुलनेत 31 मार्च 2024 पर्यंतच्या अशा दायित्वांचा आणि मत्तांचा सारांश **तक्ता 1.3** मध्ये देण्यात आला आहे.

तक्ता 1.3: मत्ता आणि दायित्वांची संक्षिप्त स्थिती

(₹ कोटीत)

दायित्वे					मत्ता				
		2022-23	**2023-24**	***टक्के* वाढ**			**2022-23**	**2023-24**	***टक्के* वाढ**
एकत्रित निधी									
अ	देशांतर्गत कर्ज	485782.24	562854.45	15.87	अ	स्थूल भांडवली खर्च	497532.81	570106.20	14.59
ब	केंद्र शासनाकडून कर्जे आणि अग्रिमे	47160.11	55258.59	17.17	ब	कर्जे आणि अग्रिमे	32108.99	36340.95	13.18
आकस्मिकता निधी		150.00	150.00	0.00					
लोक लेखे									
अ	अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी *इ.*	29733.37	30259.90	1.77	अ	अग्रिमे	14.51	7.11	(-)51.00
ब	ठेवी	85526.83	95598.10	11.78	ब	वित्तप्रेषण	0	0	0
क	राखीव निधी	73395.17	83180.35	13.33	क	निलंबन आणि संकीर्ण	0	0	0
ड	वित्तप्रेषण	1639.14	1249.91	(-)23.75	**रोख शिल्लक**		**20646.73**	**20356.31**	**(-)1.41**
					नियोजित (ईयरमार्क) निधीमध्ये गुंतवणूक		60843.98	68890.43	13.22
इ	निलंबन आणि संकीर्ण	30659.80	23804.88	(-)22.36	**एकूण रक्कम**		**81490.71**	**89246.74**	**9.52**
					महसुली लेख्यातील तूट		143433.36	157188.89[$]	9.59
					संकीर्ण भांडवली जमा		(-)533.72	(-)533.72	0
एकूण		**754046.66**	**852356.18**	**13.04**	**एकूण**		**754046.66**	**852356.18**	**13.04**

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

[$] प्राप्तीवरील खर्चाच्या एकूण अतिरेकांतर्गत चालू वर्ष आणि मागील ₹ 13,755.53 कोटीच्या फरकात महसुली तूट ₹ 13,754 कोटी आणि एफ-निलंबने आणि संकीर्ण लेखा शीर्षांतर्गत निव्वळ खाते ₹ 1.53 कोटी (कर्ज, ठेवी आणि प्रेषण शीर्षकांतर्गत जुनी थकबाकी भरण्यासाठी समायोजन) यांचा समावेश आहे.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, 2023-24 मध्ये मत्त्यात 13.85 *टक्के* वाढ झाली, तर मागील वर्षाच्या तुलनेत दायित्व 13.04 *टक्क्यांनी* वाढले. 2023-24 मध्ये वर्षाच्या अखेरीस राज्याची रोख शिल्लक ₹ 20,356.31 कोटी होती. राखून ठेवलेल्या निधीच्या गुंतवणुकीसह रोख शिल्लकमध्ये 9.52 *टक्के* वाढ झाली होती आणि मार्च 2024 च्या अखेरीस रोख शिल्लक ₹ 89,246.74 कोटी होती.

1.4 राजकोषीय समतोल: तूट आणि एकूण ऋणांचे उद्दिष्ट यांची साध्यता

जेव्हा शासन महसुलाच्या माध्यमातून जमा केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च करते, तेव्हा त्याला तूट सहन करावी लागते. महसुली तूट, राजकोषीय तूट आणि प्राथमिक तूट अशी शासकीय तूट शोधून काढण्याची विविध मोजमापे आहेत. तुटीचे स्वरूप हे शासनाच्या वित्तीय व्यवस्थापनाच्या विवेकबुद्धीचे द्योतक आहे. शिवाय, तूट कशा प्रकारे भरून काढली जाते आणि उभारलेल्या संसाधनांचा वापर हे राज्याच्या राजकोषीय आरोग्याचे महत्त्वाचे द्योतक आहेत. या विभागात महाराष्ट्र राजकोषीय

उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 अन्वये निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या तुलनेत महसुली व राजकोषीय तुटीच्या प्रत्यक्ष पातळीचे मूल्यमापन तसेच या तुटीचे स्वरूप, परिमाण आणि वित्तपुरवठा करण्याची पद्धत सादर करण्यात आली आहे.

राज्य शासनाने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 लागू केला असून त्यात वेळोवेळी सुधारणा करून राजकोषीय व्यवस्थापनात आंतर-पिढीगत समता आणि दीर्घकालीन स्थूल आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्याच्या उद्देशाने त्यात वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. या अधिनियमात महसुली तूट उत्तरोत्तर दूर करणे, राजकोषीय तूट कमी करणे आणि राजकोषीय शाश्वततेशी सुसंगत विवेकी कर्ज व्यवस्थापन परिकल्पित केले आहे.

महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम फेब्रुवारी 2006 मध्ये तयार करण्यात आले आणि त्यानंतर वेळोवेळी त्यात सुधारणा करण्यात आल्या. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 नुसार, राज्याचे एकूण दायित्व म्हणजे राज्याचा एकत्रित निधी आणि राज्याच्या लोक लेख्यांतर्गत असलेले दायित्वे. अशाप्रकारे, 'एकूण प्रलंबित कर्जे/दायित्वे' या व्यापक व्याख्येत, एकत्रित निधीवरील दायित्वे, सार्वजनिक लेख्यांवरील दायित्वे आणि राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी घेतलेली कर्जे आणि विशेष उद्देश वाहने आणि इतर समतुल्य साधनांनी घेतलेली कर्जे, ज्यात मुद्दल आणि/किंवा व्याज राज्याच्या अर्थसंकल्पातून दिले जाणार आहे.

राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्क्यांपेक्षा* कमी ठेवून राजकोषीय तूट आटोक्यात आणणे आणि 2011-12 नंतर महसुली आधिक्य कायम ठेवणे ही राज्याची प्रमुख राजकोषीय उद्दिष्टे होती. तथापि, त्यानंतरच्या काळात आणखी सुधारणा करून 2013-14 ते 2021-22 या कालावधीत '2011-12 नंतर महसुली आधिक्य’ हे कलम (खंड) शिथिल करण्यात आले.

कोविड-19 महामारीमुळे राज्याच्या संसाधनांवर विपरीत परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त संसाधने उभी करण्यासाठी केंद्र शासनाने राज्याला स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2020-21 या वर्षासाठी दोन *टक्के*, 2021-22 साठी एक *टक्का* आणि 2022-23 साठी 0.5 *टक्के* इतकी अतिरिक्त कर्ज मर्यादा मंजूर केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2020 तील सुधारणानुसार राजकोषीय तुटीची मर्यादा स्थूल राज्य उत्पन्नाच्या वर्ष 2020-21 व 2021-22 साठी चार *टक्क्यां*पर्यंत आणि वर्ष 2022-23 साठी 3.5 *टक्क्यांपर्यंत* वाढविली आहे. वर्ष 2023-24 साठी राजकोषीय तुटीची मर्यादा स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्के* इतकी उद्दिष्टीत आहे.

गत पाच वर्षांच्या कालावधीत (2019-20 ते 2023-24) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 मध्ये विहित केलेल्या प्रमुख राजकोषीय निकषांचे कल विश्लेषण **तक्ता 1.4 (अ)** मध्ये साध्यांसहीत दर्शिवले आहेत.

तक्ता 1.4(अ): 2019-20 ते 2023-24 या कालावधीत अधिनियमात विहित केलेल्या प्रमुख राजकोषीय उद्दिष्टांचे कल विश्लेषण

राजकोषीय मापदंड	अधिनियमात निश्चित केलेली राजकोषीय उद्दिष्टे	साध्य (₹ कोटींत)				
		2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
महसुली तूट (-)/ अधिशेष (+) (₹ कोटीत)	2021-22[1] नंतर महसुली आधिक्य	(-)17115.63	(-)41141.85	(-)16374.32	(-)1936.47	(-)13754.00
		✓	✓	✓	✗	✗
राजकोषीय तूट (-) (स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्केवारीनुसार*)	तीन *टक्के* (3.0) (2020-21 व 2021-22 मध्ये चार *टक्के* (4.0) आणि 2022-23 मध्ये 3.5 *टक्के*)	(-)53886.19 (-2.03)	(-)71558.05 (-2.74)	(-)64301.86 (-2.05)	(-) 67601.87 (-1.85)	(-)90559.36 (-2.24)
		✓	✓	✓	✓	✓
एकूण प्रलंबित दायित्वांचे स्थूल राज्य उत्पन्नाशी गुणोत्तर (*टक्केवारीत*)	लक्ष्य$	15.83	16.15	20.64	18.14	18.23
	साध्य	18.06	21.00*	19.28*	18.12	18.75
		✗	✗	✓	✓	✗

स्त्रोत : संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे आणि अर्थसंकल्पीय दस्तऐवज (अभिलेखे)

*2020-21 आणि 2021-22 या वर्षात महाराष्ट्र शासनाला वस्तू व सेवा कर भरपाईच्या बदल्यात पाठोपाठ अनुक्रमे ₹ 11,977 कोटी आणि ₹ 13,782.36 कोटींचे कर्ज मिळाले. केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालयाच्या व्यय विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विशेष खिडकीअंतर्गत घेतलेले कर्ज (2020-21 साठी ₹ 11,977 कोटी आणि 2021-22 साठी ₹ 13,782.36 कोटी) वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज मानले गेले नाही.

$ महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, 2006 नुसार, मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्रात राजकोषीय निर्देशंकांसाठी तीन वर्षांचे चढती लक्ष्ये दर्शविली जातात. संबंधित वर्षाचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्र स्थूल राज्य उत्पन्नाच्या थकित दायित्वांसाठी सर्वसाधारण उद्दिष्ट 25 *टक्क्यांच्या* आत असणे आवश्यक आहे तर स्थूल राज्य उत्पन्नाच्या थकित दायित्वांचे चढते लक्ष्य संबंधित वर्षांच्या अंदाजपत्रकानुसार दर्शविले गेले आहे त्यामुळे संबंधित वर्षांचा अंदाजपत्रक उद्दिष्ट म्हणून घेतले जाते. सर्वसाधारण उद्दिष्टांचा विचार केला तर स्थूल राज्य उत्पन्नाची थकबाकी 25 *टक्क्यांच्या* मर्यादेच्या आत असेल.

तक्ता 1.4(अ) नुसार असे निदर्शनास येते की, 2019-20 ते 2023-24 या पाच वर्षांच्या कालावधीत राज्याला महसुली आधिक्य प्राप्त करता आले नाही. 2022-23 मध्ये ₹ 1,936.47 कोटीची महसुली तूट 2023-24 मध्ये वाढून ₹ 13,754 कोटी इतकी झाली. राजकोषीय तूट तीन *टक्क्यांपेक्षा* कमी ठेवण्यात राज्य यशस्वी ठरले.

24-2023 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात प्रमुख राजकोषीय समुच्चयासंदर्भात पंधराव्या वित्त आयोगाने निश्चित केलेली उद्दिष्टे आणि राज्याच्या अर्थसंकल्पात अंदाजित उद्दिष्टे आणि त्यांची साध्यता **तक्ता 1.4(ब)** मध्ये दर्शविली आहे.

[1] महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक 21 जानेवरी 2022 च्या अधिसूचनेनुसार

तक्ता 1.4(ब): वर्ष 2023-24 मधील प्रमुख राजकोषीय समुच्चयासंदर्भातील लक्ष्याच्या तुलनेत साध्यता

राजकोषीय संज्ञा (व्हेरियेबल)	पंधराव्या वित्त आयोगाने विहित केलेली लक्ष्ये	अर्थसंकल्पातील लक्ष्ये	प्रत्यक्ष	प्रत्यक्ष फरकाची *टक्केवारी*	
				पंधराव्या वित्त आयोगाची लक्ष्ये	अर्थसंकल्पातील लक्ष्ये
महसुली तूट (-) आधिक्य (+)/स्थूल राज्य उत्पन्न (*टक्के*)	(-)1.36	(-)0.42	(-)0.34	1.02	(-)0.08
राजकोषीय तूट (-)/स्थूल राज्य उत्पन्न (*टक्के*)	(-)3.0	(-)2.46	(-)2.24	(-)0.76	(-)0.22
एकूण प्रलंबित दायित्व/स्थूल राज्य उत्पन्न (*टक्के*)	28.10	18.23	18.75	(-)9.35	0.52
स्त्रोत: पंधराव्या वित्त आयोगाची शिफारस, महाराष्ट्र शासनाचे वार्षिक वित्तीय विवरणपत्रे, वित्तीय लेखे					

सन 2023-24 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्केवारी*नुसार महसुली तूट, राजकोषीय तूट आणि एकूण प्रलंबित दायित्व पंधराव्या वित्त आयोगाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या मर्यादेत होते.

1.4.1 मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण विवरणपत्रातील प्रक्षेपित वित्तीय मापदंडांच्या उद्दिष्टांची चालू वर्षातील प्रत्यक्षाबरोबर तुलना

महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, 2006 (2008 मध्ये सुधारित) दरम्यान विहित केल्यानुसार, राज्य शासनाने विहित राजकोषीय निर्देशांकांचे उद्दीष्ट निश्चित करणारे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्र राज्य विधिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे. राज्य विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्रामध्ये 2023-24 साठी केलेले प्रक्षेपण आणि वर्षातील प्रत्यक्ष यांच्यातील तफावत **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.5: 2023-24 साठीच्या मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्रातील प्रक्षेपणाच्या तुलनेत प्रत्यक्ष

अ. क्र.	राजकोषीय संज्ञा	मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्रानुसार प्रक्षेपण	प्रत्यक्ष	तफावत (*टक्केवारीत*)
		(₹ कोटीत)		
1	स्वत:चा कर महसूल	298181.00	302343.37	1.40
2	करेतर महसूल	24169.70	20857.94	(-)13.70
3	केंद्रीय करांचा वाटा	64524.88	71349.75	10.58
4	केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदाने	62647.02	36045.40	(-)42.46
5	महसुली जमा (1+2+3+4)	449522.61	430596.46	(-)4.21
6	महसुली खर्च	465645.02	444350.46	(-)4.57
7	महसुली तूट (-)/आधिक्य (+) (5-6)	(-)16122.41	(-)13754.00	(-)14.69
8	राजकोषीय तूट (-)/आधिक्य (+)	(-)95500.80	(-)90559.36	(-)5.17
9.	प्राथमिक तूट	(-)44853.17	(-)44907.45	0.12
10	एकूण प्रलंबित दायित्वे/ स्थूल राज्य उत्पन्न *(टक्के)*	18.23	18.75	2.85
11	चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न वाढीचा दर (*टक्के)*	9.99	10.93	9.41
स्त्रोत: 2023-24 चे वित्तीय लेखे आणि अर्थसंकल्प दस्तऐवज				

तक्ता 1.5 वरून असे निदर्शनास येते की, 2023-24 मध्ये, राजकोषीय तूट आणि महसुली तूट हे दोन्ही प्रमुख राजकोषीय निकष, मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्रामधील प्रक्षेपणानुसार होते, तसेच प्राथमिक तूट आणि कर्ज - स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तरात किंचित, म्हणजे अनुक्रमे 0.12 *टक्के* आणि 2.85 *टक्के* बदल झाला.

1.4.2 तुटीचा कल

पाच वर्षांच्या कालावधीतील (2019-20 ते 2023-24) आधिक्य/तुटीचा कल **आलेख 1.3** मध्ये दर्शविला आहे; स्थूल राज्य उत्पन्नाशी संबंधित आधिक्य/तुटीचा कल **आलेख 1.4** मध्ये दर्शविला आहे आणि राजकोषीय दायित्वे आणि स्थूल राज्य उत्पन्नाचा कल **आलेख 1.5** मध्ये दर्शविला आहे.



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)



(स्त्रोत: महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2023-24 आणि संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

महसुली जमा ही महसुली खर्च भागविण्यासाठी अपुरी होती हे महसुली तूट दर्शविते. 2022-23 च्या तुलनेत महसुली तुटीमध्ये लक्षणीय वाढ होऊन ₹ 1,936.47 कोटींवरून, 2023-24 मध्ये ₹ 13,754 कोटींवर पोहोचली. 2023-24 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या गुणोत्तरात महसुली तूट 0.34 *टक्के* होती.

राजकोषीय तूट ही ऋणेतर जमा आणि एकूण खर्च यांच्यातील तफावत दर्शवते. ही तूट एकतर अतिरिक्त लोक ऋणांद्वारे किंवा लोक लेख्यांमधून अतिरिक्त निधी वापरून भरून काढली जाऊ शकते. राजकोषीय तूट सामान्यत: शासनाची निव्वळ वाढीव देणी दायित्वे/किंवा त्याच्या अतिरिक्त कर्जाच्या गरजा दर्शविते. राजकोषीय तूट 2022-23 मधील ₹ 67,601.87 कोटींवरून लक्षणीयरित्या वाढून 2023-24 दरम्यान ₹ 90,559.36 कोटींवर पोहोचली. तथापि, स्थूल राज्य उत्पन्नाच्या गुणोत्तरात राजकोषीय तूट 2022-23 मधील 1.85 *टक्क्यांवरून* 2023-24 दरम्यान 2.24 *टक्के* इतकी वाढली.

प्राथमिक तूट जी, ऋणेतर जमांपेक्षा जास्त प्राथमिक खर्च (निव्वळ व्याज प्रदाने वगळून एकूण खर्च) दर्शविते, 2022-23 च्या ₹ 25,912.71 कोटींच्या तुलनेत 2023-24 मध्ये ₹ 44,907.45 कोटी होती.

आलेख 1.5: राजकोषीय दायित्व आणि देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नातील कल

(₹ कोटीत)



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

वाढत्या देशांतर्गत ऋणांमुळे एकूण प्रलंबित दायित्वात सातत्याने वाढ होऊन, 2019-20 मधील ₹ 4,79,899 कोटींवरून ही रक्कम 2023-24 मध्ये ₹ 7,58,260.94 कोटींवर पोचली. वर्ष 2020-21 आणि 2021-22 दरम्यान महाराष्ट्र शासनाला वस्तू व सेवा कर भरपाईच्या बदल्यात अनुक्रमे

₹ 11,977 कोटी आणि ₹ 13,782.36 कोटींचे पाठोपाठ कर्ज मिळाले. केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालयाच्या व्यय विभागानुसार, विशेष खिडकीअंतर्गत घेतलेले कर्ज (2020-21 साठी ₹ 11,977 कोटी आणि 2021-22 साठी ₹ 13,782.36 कोटी) वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज मानले गेले नाही. 2023-24 मध्ये राज्याच्या प्रलंबित दायित्वात मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 97,507 कोटींनी (14.76 *टक्के*) वाढ झाली. 2023-24 मध्ये एकूण दायित्वांपैकी देशांतर्गत ऋण 74.23 *टक्के*, केंद्र शासनाचे कर्ज 7.29 *टक्के* आणि लोक लेखे दायित्व 18.48 *टक्के* होते. 2023-24 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या गुणोत्तरात थकीत कर्जाचे प्रमाण 18.75 *टक्के* होते, जे मध्यम मुदत राजकोषीय धोरण विवरणपत्रामधील अर्थसंकल्पीय अंदाजात निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा (18.23 *टक्के*) किंचित जास्त होते.

1.4.3 केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेनुसार कर्ज घेण्यासंदर्भात राज्य शासनाची कामगिरी

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 293(3) मध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, केंद्र शासनाने राज्याला दिलेल्या कर्जाचा काही भाग अजूनही थकीत असेल तर केंद्र शासनाच्या संमतीशिवाय राज्य कोणतेही कर्ज घेऊ शकत नाही.

भारताच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने 2023-24 या आर्थिक वर्षासाठी राज्य शासनाची निव्वळ कर्ज मर्यादा ₹ 1,21,327.53 कोटी[2] एवढी निश्चित केली (मार्च 2021) आणि राज्य शासनाला निर्देश दिले की सर्व स्त्रोतांकडून घेतलेली वाढीव कर्जे या मर्यादेच्या आत राहतील. वर्ष 2023-24 साठी राज्यांची निव्वळ कर्ज मर्यादा निश्चित करताना केंद्र शासनाने निर्णय घेतला (मार्च 2023) की राज्य सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या/महामंडळे आणि इतर समतुल्य साधने जिथे मुद्दल आणि व्याज राज्याच्या अर्थसंकल्पातून किंवा कर/उपकर किंवा कोणत्याही राज्याच्या महसुलाद्वारे दिले गेले आहे ते भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 293(3) अन्वये संमती जारी करण्याच्या हेतूने राज्यानेच घेतलेले कर्ज मानले जाईल.

वित्तीय लेख्यांचे विवरणपत्र 6 नुसार 2023-24 या आर्थिक वर्षात राज्य शासनाची वाढीव कर्जे आणि इतर दायित्वे ₹ 97,507.22 कोटी होती जी ₹ 1,21,327.53 कोटीच्या कर्जाच्या मर्यादेत राहिली.

1.5 लेखापरीक्षणोत्तर तूट आणि एकूण कर्ज

लेखापरीक्षणात लेख्यांतील चुकीचे वर्गीकरण आणि अर्थसंकल्पेतर वित्तीय व्यवहार दिसून आले ज्यांचा परिणाम एकूण तूट व कर्जाच्या आकडेवारीवर दिसून आला .लेखापरीक्षणानंतर निदर्शनास आलेली तूट व कर्ज आकडेवारी खालील परिच्छेदांत स्पष्ट केली आहे.

1.5.1 लेखापरीक्षणोत्तर - तूट

महसुली खर्चाचे भांडवली म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्यास तुटीच्या आकडेवारीवर परिणाम होतो. याशिवाय, सुस्पष्ट दायित्वे लांबणीवर टाकणे, एकत्रित निधीत उपकर/स्वामित्वधन जमा न करणे,

---

[2] राष्ट्रीय सर्वेक्षण कार्यालयाद्वारे प्रकाशित केलेल्या स्थूल राज्य उत्पन्न विदा आणि पंधराव्या वित्त आयोगाने निर्धारित केलेली कार्यपद्धती यांच्यावर आधारित 2023-24 च्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या (₹ 40,44,251 कोटी). 3.0 *टक्के*

नवीन निवृत्तीवेतन योजनेत अल्प अंशदान, कर्ज निवारण व विमोचन निधी इत्यादींचाही महसूल आणि राजकोषीय तुटीच्या आकडेवारीवर परिणाम होतो. प्रत्यक्ष तुटीचे आकडे गाठण्यासाठी अशा अनियमिततेचा परिणाम बदलणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापनने मुद्दल व व्याज याद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे ती विचारात घेतली जातील.

2023-24 मध्ये राज्य शासनाने निधीतील कमी/अंशदान न करणे आणि चुकीचे वर्गीकरण/नोंद विचारात घेऊन प्रत्यक्ष आधिक्य/तुटीचे मूल्यमापन **तक्ता 1.6** मध्ये केले आहे.

तक्ता 1.6: 2023-24 मध्ये महसुली तूट आणि राजकोषीय तुटीवरील काही व्यवहारांचा परिणाम

तपशील	महसुली तुटीवर होणारा परिणाम (ऊनोक्ती अंडरस्टेटमेंट) (+) जास्त / (अत्युक्ती ओव्हरस्टेटमेंट) (-) कमी (₹ कोटीत)	राजकोषीय तुटीवर होणारा परिणाम (ऊनोक्ती) (+) (₹ कोटीत)	परिच्छेद संदर्भ
आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पाबाहेरील वित्तीय कामकाज जसे की राज्य सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, विशेष उद्दिष्ट वाहन आणि इतर समतुल्य साधनांनी घेतलेली कर्जे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे घेतलेली कर्जे जिथे मुद्दल आणि/किंवा व्याज राज्याच्या अर्थसंकल्पातून दिले जाणार आहे एकूण कर्ज ओळखण्याच्या परिपूर्णतेचा मुद्दा		(+)7700	2.7.1
महसूल आणि भांडवली खर्च यांच्यातील चुकीचे वर्गीकरण	(+)3,544.73		3.3.6
राखीव निधी आणि व्याज देणाऱ्या ठेवींवरील व्याजाचे समायोजन न करणे	(+)552.39	(+)552.39	4.1
उपकर/शुल्क/अधिभार हस्तांतरित न करणे	(+)906.53	(+)906.53	प्रकरण II
एकूण	**5003.65**	**9158.92**	

स्त्रोत: 2023-24 चे वित्तीय लेखे आणि लेखापरीक्षणोत्तर विश्लेषण

- केंद्र शासन लेखांकन मानक (इंडियन गव्हर्नमेंट अकाउंटिंग स्टॅंडर्ड)-2 सहाय्यक अनुदानाची महसुली खर्चात नोंद करावी असे विहित करते. तथापि, राज्य शासनाने चुकीच्या पद्धतीने अर्थसंकल्पित केले आणि ₹ 3,544.73 कोटीचे सहाय्यक अनुदान महसूल विभागाऐवजी भांडवली विभागात नोंदवले.
- राखीव निधी व व्याज देणाऱ्या ठेवी यामध्ये गुंतवणूक न करता पडून असलेल्या शिल्लक रकमेवर व्याज देणे राज्य शासनाला बंधनकारक होते. काही राखीव निधी व ठेवी आणि अग्रिमे यांच्यावर ₹ 552.39 कोटीचे व्याज दायित्वाची तरतूद केली नव्हती.
- राज्याच्या एकत्रित निधीअंतर्गत जमा करण्यात आलेला ₹ 906.53 कोटींचा उपकर (कामगार उपकर वगळता) राखीव निधीतील संबंधित निधी लेख्यांमध्ये वर्ग करण्यात आला नाही.

परिच्छेद 1.4.2 आणि **परिच्छेद 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2023-24 मध्ये महसुली तूट आणि राजकोषीय तूट अनुक्रमे ₹ 13,754 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.34 *टक्के*) आणि ₹ 90,559.36 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.24 *टक्के*) होती. जर **तक्ता 1.6** मध्ये दर्शविलेल्या व्यवहारांचा

विचार केल्यास प्रत्यक्ष महसुली तूट आणि राजकोषीय तूट अनुक्रमे ₹ 18,757.65 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.46 *टक्के*) आणि ₹ 99,718.28 कोटी (स्थूल देशांतर्गत राज्य उत्पन्नाच्या 2.47 *टक्के*) होईल.

1.5.2 लेखापरीक्षणोत्तर - एकूण लोक ऋण

महाराष्ट्र वित्तीय उत्तरदायित्व व अंदाजपत्रक व्यवस्थापन अधिनियम, 2005 नुसार एकूण दायित्वे म्हणजे राज्याचा एकत्रित निधी व राज्याच्या सार्वजनिक खात्यांतर्गत असलेली देणी होय. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, 2006 मध्ये 'अर्थसंकल्पबाह्य ऋण' म्हणजे अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली जमा ज्यांचे दायित्व आकस्मिक स्वरूपाचे नसते व ज्यांची परतफेड अर्थसंकल्पातून केली जाते व ते व्याज व मुद्दल यांद्वारे करण्याची आवश्यकता आहे. ही दायित्वे शासनाच्या मालकिच्या किंवा शासनाच्या नियंत्रणात असलेले सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा विभागीय वाणिज्यक उपक्रम जे शासनाच्या वतीने बाजार कर्जांद्वारे संसाधने उभी करतात. परंतु, शासनाने अर्थसंकल्पातून कर्जांची परतफेड करावी.

अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली दायित्वे निर्माण केल्याने पारदर्शकतेचे आणि आंतर-पिढीतील समतेचे प्रश्न निर्माण करतो. अशी अर्थसंकल्पबाह्य कर्जे अर्थसंकल्पाच्या दस्ताऐवजाच्या विवरणपत्रात किवा लेख्यात दर्शविली जात नाहीत तसेच त्यांना वैधानिक मान्यता ही नसते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या कर्जांबद्दल वर्ष 2023-24 मध्ये ₹ 7,700 कोटी व वर्ष 2022-23 मध्ये ₹ 2,500 कोटी कर्ज गृहनिर्माण व नागरी विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून राज्य शासन हमीच्या आधारावर घेतले होते. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या मंजूरीच्या अटींनुसार महाराष्ट्र शासनाने दरवर्षी संबंधित ऋण करारांतर्गत मुद्दल, व्याज व इतर कोणत्याही शुल्काचा समावेश असलेल्या ऋणाच्या चलनादरम्यान गृहनिर्माण व नागरी विकास महामंडळाच्या दायित्वांच्या परतफेडीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी. 31 मार्च 2024 रोजी, ₹ 10,135 कोटी अर्थसंकल्पबाह्य दायित्व प्रलंबित होते ज्यांचा परिणाम **तक्ता 1.7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्याच्या प्रलंबित लोक ऋण व इतर दयित्वावर झालेला आहे.

तक्ता 1.7: 31 मार्च 2024 पर्यंत थकित सार्वजनिक कर्ज आणि इतर दायित्वांचा घटक

(₹ कोटीत)

थकित सार्वजनिक कर्ज आणि इतर दायित्वे	31 मार्च 2024 रोजी ची रक्कम
अंतर्गत ऋण (अ)	**562854.45**
बाजार कर्जे	502792.46
वित्तीय संस्थांकडून कर्जे	26088.39
राष्ट्रीय अल्प बचत निधीला देण्यात आलेले विशेष रोखे	33231.98
इतर कर्जे	741.62
केंद्र शासनाकडून कर्जे व अग्रिमे (ब)	**55258.59**
योजनेतर कर्जे	16.35
1984-85 च्या पूर्वीच्या कर्जासाठी योजनेतर कर्जे	6.73
राज्य/केंद्रशासित योजनांसाठी कर्जे	2361.90
इतर कर्जे	52873.61

थकित सार्वजनिक कर्ज आणि इतर दायित्वे	31 मार्च 2024 रोजी ची रक्कम
लोक लेख्यांवरील दायित्वे (क)	**140147.91**
अल्पबचत भविष्य निर्वाह निधी इ.	30259.90
राखीव निधी	14290.01
ठेवी	95598.00
एकूण (अ+ब+क) (वित्त लेखे 24-2023 नुसार)	**758260.95**
अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे	
2023-24 दरम्यान अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे	7700
31 मार्च 2024 रोजी अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे	10135
एकूण	**768395.95**

अशाप्रकारे, 31 मार्च 2024 रोजी राज्याचे प्रलंबित लोक ऋण आणि इतर दायित्वे अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली दायित्वासह ₹ 7,68,395.95 कोटी होती. परंतु, वर्ष 2023-24 च्या वित्त लेख्यात ती ₹ 7,58,260.95 कोटी दर्शविली होती. अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली ऋणासह प्रलंबित दायित्वे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नांच्या टक्केवारीत 19 *टक्के* इतकी होती.